SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : Director Office –( 0231)2609068 CAP Section – (0231)2609317/2609110
Website – www.unishivaji.ac.in, Email – cap@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६००४, महाराष्ट्र
दुरध्वनी : संचालक कार्यालय-०२३१ २६०९०६८ मध्यवर्ती मूल्यमापन विभाग-०२३१ २६०९३१७/२६०९११०
संकेतस्थळ - www.unishivaji.ac.in, ई-मेल आयडी - cap@unishivaji.ac.in
Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

**Ref. No. SU/Exam/CAP/961** **Date : 27.05.2023**

**अत्यंत महत्त्वाचे**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :-** मार्च/एप्रिल,२०२३ या उन्हाळी सत्राच्या मूल्यमापन कामकाजासाठी तातडीने परीक्षक उपलब्ध करुन देणेबाबत.

महोदय/महोदया,

मार्च/एप्रिल,२०२३ या उन्हाळी सत्राच्या बी.ए. व बी.कॉम. अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या परीक्षा दि.२५ मे, २०२३ पासून सुरु झाल्या आहेत. तसेच, बी.एस्सी. अभ्यासक्रमाची तृतीय वर्षाची परीक्षा दि.०१ जून, २०२३ पासून सुरु होवून ०६ जून २०२३ रोजी संपत आहे, हे आपणास विदीत आहेच. मार्च/एप्रिल,२०२३ या उन्हाळी सत्रासाठी प्रथम वर्ष परीक्षेबरोबरच द्वितीय वर्षाचीही परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर देण्यात आली आहे. त्यामुळे महाविद्यालयांमध्येही परीक्षेचे कामकाज सुरु आहे.

सर्व परीक्षांचे निकाल महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ अन्वये ३० दिवसांच्या आत जाहीर करणेबाबत मा.कुलपती महोदयांकडून स्पष्ट निर्देश प्राप्त झाले आहेत. तसेच, सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षाही संपन्न झाल्या आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रीया सुरु होण्यापूर्वी पारंपारिक पदवी स्तरावरील तृतीय वर्षाच्या परीक्षांचे निकाल जाहीर होणे क्रमप्राप्त आहे. तृतीय वर्षाच्या परीक्षेच्या निकालावर विद्यार्थ्यांचे पदव्युत्तर प्रवेश तसेच नोकरीच्या संधी अवलंबून असतात.

उपरोक्त नमुद केलेल्या बाबी अवलोकनी घेता तृतीय वर्षाचे निकाल प्राधान्याने जाहीर करणे आवश्यक आहे. तसेच, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे नवीन विद्यावर्ष दि.०१ जुलै, २०२३ पासून सुरु होणार असल्याने मा.कुलगुरुंनी पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रीया दि.१९ जून, २०२३ ते २४ जून, २०२३ या कालावधीमध्ये निश्चित केली आहे. त्यामुळे **बी.एस्सी. परीक्षेचा निकाल १८ जून,२०२३ रोजी जाहीर करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत.**

याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, पारंपारिक पदवी स्तरावरील निकाल लवकरात लवकर जाहीर करण्यासाठी आपल्या महाविद्यालयांमधील संबंधीत विषयांच्या शिक्षकांना नियोजित मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रांवर नेमुन दिलेल्या तारखेस तातडीने पाठविणेत यावे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ कलम ४८(४) नुसार परीक्षेचे कामकाज करणे बंधनकारक आहे. सबब, तृतीय वर्ष मूल्यमापन कामास प्राधान्य देवून निकाल वेळेवर जाहीर करण्याची आपली जबाबदारी पार पाडण्यास सहकार्य करावे.

कळावे,

आपला विश्वासू,
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ